श्री.सं.दि.मानकर,उप संचालक, बाष्पके
यांच्या पदस्थापनेबाबत

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन आदेश क्र. बाष्पके-२०१९/प्र.क्र. ८७/भाग-१/काम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २९ जुलै, २०२४

वाचा :- १. शासन आदेश, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बाष्पके- ०५१९/प्र.क्र.८७/ कामगार-१, दि.२६ जुलै, २०२४.
२.नागरी सेवा मंडळाचे दि.२९/७/२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

श्री. सं. दि. मानकर, उप संचालक, बाष्पके यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रकरणी त्यांना सह संचालक, बाष्पके, गट-अ या पदावरून उप संचालक, बाष्पके, गट-अ या पदावर पदावनत करण्याबाबतचे शिक्षा आदेश उपरोक्त संदर्भीय क्र.१ येथील दि.२६/७/२०२४ रोजीच्या आदेशान्वये पारित केले आहेत. त्यानुषंगाने श्री. सं. दि. मानकर यांना उप संचालक, गट-अ या संवर्गात पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश:-

श्री. सं. दि. मानकर यांना उपरोक्त दिनांक २६.०७.२०२४ रोजीच्या आदेशान्वये पदावनत केल्यामुळे त्यांना पदावनतीच्या संवर्गात पदस्थापना देण्यासाठी दिनांक २९.०७.२०२४ रोजी नागरी सेवा मंडळाची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत नागरी सेवा मंडळाने श्री. सं. दि. मानकर यांना सहसंचालक, बाष्पके, कोल्हापूर येथील कार्यालयातील उप संचालक या रिक्त पदावर पदस्थापना देण्याची शिफारस सक्षम प्राधिका-यास केली आहे.

२. सक्षम प्राधिकाऱ्याने नागरी सेवा मंडळाच्या उक्त शिफारशीस सहमती दिलेली असल्याने श्री.सं.दि.मानकर, उप संचालक,गट-अ यांना खालील तक्त्यातील अ.क्र.४ येथे दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे -

अ. क्र.	**अधिकाऱ्यांचे नांव**	**पदनाम**	**पदस्थापनेबाबत नागरी सेवा मंडळ (१) यांनी केलेली पदस्थापनेची ठिकाण/ कार्यालय**
१	**२**	**३**	**४**
१	श्री.सं.दि.मानकर	उप संचालक,गट-अ	सहसंचालक, बाष्पके, कोल्हापूर या कार्यालयातील उपसंचालक या रिक्त पदावर

३. उपरोक्त नमूद अधिकाऱ्यास सदर आदेशाद्वारे एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत असून, त्यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. तसेच रुजू अहवाल शासनास संचालनालयामार्फत सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२४०७२९१७४५४०४५१० असा आहे. सदर आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KARANSING PREMSING PATIL

Digitally signed by KARANSING PREMSING PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=6f2521c3a6d1f8429a3c2c9a42d575298ae82956908d63df441063695f377819, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C7FEED7178D6C14666A5DF36811F1763590E65B6F836A87E63789DC234173D66, cn=KARANSING PREMSING PATIL
Date: 2024.07.29 18:00:30 +05'30'

(क. प्रे. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

श्री.सं.दि.मानकर, उप संचालक, बाष्पके
(द्वारा संचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई)

प्रत -

१. मा .मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई,
३. संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई
४. सह संचालक,बाष्पके, नागपूर/कोल्हापूर
५. निवड नस्ती.(काम-१)